# नाचू कीर्तनाचे रंगी!

## प्रल्हाद जाधव

पात्र संयोजन :

१. डॉ. शारदाबाई पाठक (४०)

२. अन्नपूर्णाबाई (५०)

३. राधिकाबाई (६५)

४. वसुंधराबाई (६०)

५. विशाखाताई (६०)

६. मृणालिनीताई (६५)

७. यमुनाबाई (४०)

८. युगंधरा ऊर्फ युगा (१६)

९. पद्मावतीबाई (३०)

१०. पुष्पलताबाई (३५)

(या एकांकिकेची रचना पूर्णपणे काल्पनिक असली तरी 'वैज्ञानिक दृष्टिकोनाचा विकास' हा तिचा उद्देश आहे. त्या अनुषंगाने विविध विचारवंत, वैज्ञानिक, त्यांनी केलेले कार्य लक्षात घेतले आहे. त्या अनुषंगानेच घटना-प्रसंगांची, व्यक्ती-वर्णनांची गुंफण करण्यात आली आहे. श्रद्धेबरोबरच विज्ञाननिष्ठ भूमिका आणि विवेक या आधारावर माणूस कोणत्याही अडचणीतून मार्ग काढत पुढे जाऊ शकतो असा विचार ही एकांकिका देते. स्त्रियांमधील मासिकधर्मा सारखा अतिशय संवेदनशील विषय मांडण्यासाठी कीर्तनाचा फॉर्म प्रत्ययकारी आणि आव्हानात्मक ठरेल असे वाटल्याने मी तो स्वीकारला आहे. मात्र कीर्तनाचा हा घाट ढोबळ पातळीवर स्वीकारण्यात आला असून त्यातील अचूकतेचा दावा लेखक करीत नाही. या अनुषंगाने कोणाच्या भावना दुखावण्याचा दुरानवयानेही त्याचा हेतू नाही. पंधरा-सोळा वर्षे वयाच्या मुली पुढे येऊन कीर्तनाच्या माध्यमातून मोठ्या माणसांना काही महत्त्वाचे सांगू पाहत आहेत, हे आवर्जून लक्षात घेण्यासारखे आहे. शाळा-महाविद्यालयातून या एकांकिकेचे प्रयोग उत्तम रंगतील शिवाय खुल्या एकांकिका स्पर्धां आणि अन्य अशाच महोत्सवांमध्येही ती तितक्याच परिणामकारक पद्धतीने सादर करता येईल यात शंका नाही.)

***

(पेटी आणि तबल्याची हलकीशी जुगलबंदी सुरू आहे. पडदा उघडतो. डॉ. शारदाबाई पाठक, अन्नपूर्णाबाई, राधिकाबाई,वसुंधराबाई, विशाखाताई, मृणालिनीताई, यमुनाबाई, युगंधरा (यमुनाबाईंची मुलगी) पद्मावतीबाई

आणि पुष्पलताबाई अशा दहा जणी रंगमंचावर हात जोडून उभ्या. युगंधरा ही शाळेच्या सुंदर गणवेशात. दोन वेण्या घातलेल्या, वर लाल रिबिनीची फुले अशी स्मार्ट,चुणचुणीत मुलगी. बाकी प्रत्येकीने नऊवारी साडी नेसलेली, गजरे माळलेले, गळ्यात टाळ,नटल्या-थटलेल्या, भाविक वृत्तीच्या महिला. अर्थात् या सगळ्या पंधरा-सोळा वर्षे वयोगटातील नववी-दहावीच्या मुली आहेत. त्यांनी भूमिकेसाठी आता त्या त्या पात्राचे अवसान घेतलेले आहे. प्रत्येकीच्या खांद्याला पर्ससारखी एकेक छोटी 'साईड बॅग'आहे. त्यांना प्रयोगादरम्यान हव्या असणाऱ्या छोट्या-मोठ्या गोष्टी त्यात ठेवता येतील. शारदाबाई यमुनाबाई आणि युगंधारा या तिघी वगळता बाकी सात जणींना एक ते सात असे क्रमांक दिले आहेत त्या त्या क्रमांकासमोरील संवाद दिग्दर्शकाने त्या त्या पात्रांना वाटून द्यावेत.)

युगंधरा : (पुढे येत प्रेक्षकांशी संवाद साधते) रसिकहो, नमस्कार! आज येथे होत असलेल्या या विशेष कीर्तन महोत्सवात मी आपले सर्वांचे हार्दिक स्वागत करते. आज आपल्याला मार्गदर्शन करण्यासाठी समोर येत आहेत सुप्रसिद्ध कीर्तनकार, हरि भक्त परायण डॉक्टर श्रीमती शारदाबाई पाठक. आपण सगळे त्यांना 'कीर्तन-कौमुदी' म्हणून ओळखतो. त्यांचा या विषयाचा व्यासंग तर मोठा आहेच पण भाषा, साहित्य, संस्कृती, तत्त्वज्ञान या विषयांचाही त्यांचा अभ्यास दांडगा आहे. मी त्यांचे स्वागत करते आणि त्यांना आपले कीर्तन सुरू करण्याची विनंती करते. (ती पुष्पगुच्छ घेऊन ओळीत मधोमध उभ्या असणाऱ्या शारदाबाईंना देते, टाळ्या.)

शारदाबाई : (पुढे येत) धन्यवाद, खूप खूप आभार! आपण मला येथे बोलावले आणि (प्रेक्षकांना उद्देशून) आपणही एवढ्या मोठ्या संख्येने येथे उपस्थित राहिलात त्याबद्दल मी आपले हार्दिक स्वागत करते आणि मनापासून आभारही मानते. (पेटीवर सूर, तबल्याचे बोल...हात जोडून सुरू करतात. इतर साथ देत आहेत.)

: वक्रतुण्ड महाकाय,

सूर्यकोटि समप्रभ

निर्विघ्नं कुरु मे देव,

सर्वकार्येषु सर्वदा...

गुरुर्ब्रह्मा गुरुर्विष्णुः गुरुर्देवो महेश्वरः
गुरुर्साक्षात परब्रह्म तस्मै श्री गुरवे नमः

जय जय राम कृष्ण हरी

सर्वजणी : जय जय राम कृष्ण हरी
शारदाबाई : (गोड गळ्यावर आळवत...)
जय जय राऽऽऽम कृष्ण हरीऽऽऽ
सर्वजणी : (आळवत) जय जय राऽऽऽम कृष्ण हरीऽऽऽ

शारदाबाई : (गती वाढवत)
सुंदर ते ध्यान उभे विटेवरी
कर कटेवरी ठेवोनिया
सर्वजणी : सुंदर ते ध्यान उभे विटेवरी
कर कटेवरी ठेवोनिया
शारदाबाई : तुळसीहार गळा कासे पीतांबर
अवघे निरंतर हेचि ध्यान ऽऽऽ
(सर्वजणीची साथ)
: अवघे निरंतर हेचि ध्यान ऽऽऽ
(छान आळवत आळवत समेवर येतात.)
शारदाबाई : ठ्ठोबा रखुमाई...जय जय विठोबा रखुमाई!
सर्वजणी : ठ्ठोबा रखुमाई... जय जय विठोबा रखुमाई!
शारदाबाई : विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल!
सर्वजणी : विठ्ठल विठ्ठल विठ्ठल विठ्ठल!
शारदाबाई : बोला, पुंडलिक वरदे ऽऽऽ
सर्व : हरी विठ्ठल!
शारदाबाई : श्रीज्ञानदेव ऽऽऽ

सर्व : तुकाराम!

शारदाबाई : पंढरीनाथ महाराज की ऽऽऽ

सर्व : जय!

(एकजण पुढे येऊन शारदाबाईंना हळद-कुंकू लावते, त्यांच्या गळ्यात हार घालते, वाकून नमस्कार करते. पाठोपाठ दुसरी पुढे येऊन त्यांच्या हातात गजरा बांधते आणि नमस्कार करून पुन्हा आपल्या जागेवर जाऊन उभी राहते. हे सुरू असताना मध्येच युगंधरा आपल्या आईच्या म्हणजे यमुनाबाईंच्या कानात काहीतरी कुजबूजते. त्यानंतर त्या दोघीही हळूच रांगेतून निघून स्टेजच्या मधोमध मागे जाऊन थांबतात. उरलेल्या आठ जणींच्या पडद्याने त्यांना झाकलेले आहे. पुढे जेव्हा त्या यांना शोधायला येतील त्यावेळी त्यांचा तो पडदा मधोमध विभागून मागे बसलेली युगंधरा आणि यमुनाबाई प्रेक्षकांना दिसणार आहेत... हे सगळे घडत असताना पेटी आणि तबला सुरू आहे. जेथे जेथे मोठे विराम असतील किंवा शांतता असेल तेथे तेथे पेटीचे सूर, तबल्याचे बोल कानी येत राहतील.)

शारदाबाई :(थाटात) तर मंडळी, आज कीर्तनासाठी कोणता विषय घ्यावा हे माझे अजून ठरले नाही.

विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे आज आपल्या सगळ्यांना सगळ्याच गोष्टी माहीत झाल्या आहेत अशी परिस्थिती आहे. त्यामुळे मी तुम्हाला नवीन काय सांगणार असा प्रश्न पडला आहे, तुम्हाला कोणाला सुचवायचा आहे का एखादा विषय?

: असे कसे, तो तर तुमचा अधिकार! आम्ही अगदी सामान्य गृहिणी!

: असे कसे, काळाबरोबर बदलायला पाहिजे आपण. आपले अधिकार आपणच निर्माण करायला हवेत, आपले मत निर्भीडपणे मांडायला शिकले पाहिजे...

: असे म्हणता?

: कीर्तनाचा विषयच काय पण त्याचा जो ठरलेला साचा आहे त्यातसुद्धा बदल करायला हरकत नाही आपण!

: असे कसे? थोरामोठ्यांनी घालून दिलेल्या मार्गावरूनच पुढे जायचे असते की नाही आपण?

: हो पण काळाबरोबर बदललो नाही तर काळ आपल्याला क्षमा करणार नाही. इफ इफ यु डू नॉट चेंज विथ द टाईम, द टाईम वुईल चेंज यू! ...

: अगबाई!

: अगदी काळ्या दगडावरची रेघ आहे! बोला,विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठल!

सर्वजणी : विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठल, विठ्ठल!

: बोला पुंडलिका वरदे ऽऽऽ

: हरी विठ्ठल ऽऽऽ

: श्रीज्ञानदेव ऽऽऽ

: तुकाराम!

: पंढरीनाथ महाराज की ऽऽऽ

: जय!

शारदाबाई : कीर्तनात सुसंवादावर भर असतो पण आपण त्यात थोडे नाट्य आणायला काय हरकत आहे?

: उगाच नाट्य निर्माण करायला जावे आणि भलतेच काही घडावे असे होऊ नये!

शारदा : बघा, मी तुम्हाला निर्णय घेण्याचे स्वातंत्र्य देते आहे पण तुम्ही त्याचा वापर करू इच्छित नाही. पोपटाला जशी पिंजऱ्याची सवय होते तशीच तुम्हाला आपल्या रूढी- परंपरांची सवय झालेली आहे.

: पण तरीही कोणत्या विषयावर बोलायचं याचा निर्णय तुम्हीच घेतलेला बरा!

: हो अगदी बरोबर!

शारदाबाई : कसे समजावून सांगावे तुम्हाला?

( सूर लावत,थाटात, लयीत...)

पिता रक्षति कौमारे, भर्ता रक्षति यौवने,

रक्षन्ति स्थविरे पुत्रा, न स्त्री स्वातन्त्र्यमर्हति...

: म्हणजे हो काय?

शारदाबाई : स्त्रीने बालपणी पित्याच्या छत्राखाली रहावे, तरूणपणी पतीच्या आधाराने आणि म्हातारपणी मुलाच्या आश्रयाने राहावे,असे शास्त्र म्हणते ते तुम्हाला पटते का?

: त्यात काय पटायचे? ‘यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवता:’ असेही शास्त्रातच म्हटले आहे ना?

: जेथे स्त्रीची पूजा केली जाते त्या ठिकाणी प्रत्यक्ष परमेश्वराचा वास असतो असे म्हणतात. म्हणजे हा सन्मानच नाही का झाला स्त्रीचा?

: तो फक्त नावाचा सन्मान! एका बाजूने तिला देव्हाऱ्यात ठेवायचे आणि दुसरीकडून तिची पिळवणूक करायची!

राधिकाबाई : असे कसे? –आज प्रत्येक क्षेत्रात महिला पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून पुढे येताना दिसतात ना?

शारदाबाई : काही प्रमाणात मान्य पण बाईला तिचा खरा सन्मान आणि स्वातंत्र्य मिळते का, हा मोठाच प्रश्न आहे!

: म्हणजे नेमके काय?

: ती आज घराबाहेर पडलेली असली तरी उलट ऑफिस आणि घर अशा दुहेरी जबाबदारीत अधिकच अडकलेली दिसते की नाही?

: हे मात्र खरे आहे!

: तिचा खरा मानसन्मान तिला मिळाला पाहिजे.  तिच्याकडे खऱ्याखुऱ्या आदराने पाहिले गेले पाहिजे, पुरुषांच्या बरोबरीने वागवले गेले पाहिले पाहिजे असे नाही का वाटत तुम्हाला?

: सर्वत्रच समानता आणायची हे खरे आहे पण ‘चूल आणि मूल’ ही जबाबदारी पुरुष कसे सांभाळणार?

: हो ना, आपण आपल्या मर्यादेत राहिलेले बरे.

: बाई म्हणजे वामांगी! अगदी देवसुद्धा बायकांना आपल्या डाव्या अंगाला उभे करतात.

: तिने फक्त नवऱ्याच्या हाताला हात लावत ‘मम’ म्हणायचे!

: बरोबर!

: रूढी परंपरा मोडायच्या म्हणजे मला तर बाई भीतीच वाटते!

: परंपरा मोडायची जणू फॅशनच आलेय हल्ली!

: त्याशिवाय जणू मोठेच होत नाही आपण!

शारदाबाई : असे जर तुमचे ठाम मत असेल तर मला आता जनाबाईलाच मदतीला आणावी लागेल...

: जनाबाई?

: (प्रेक्षकांना) मंडळी! जनाबाई ही एक बंडखोर संत कवयित्री! तिने सत्यासाठी, आपल्या हक्कासाठी, स्वातंत्र्यासाठी, आपले मत मांडण्यासाठी प्राण पणाला लावला. बाईच्या जगण्याला बळ दिले, अर्थ दिला, आत्मविश्वास दिला... काय म्हणते ही जनी? बघा –

(गद्यात पण लयीत, सोबतीस पेटीचे सूर...)

: डोईचा पदर आला खांद्यावरी,

भरल्या बाजारी जाईन मी...

हाती घेऊन टाळ खांद्यावरी वीणा,

आता मज मना कोण करी...

पंढरीच्या पेठे मांडियले पाल,

मनगटावर तेल घाला तुम्ही...

जनी म्हणे देवा मी झाले वेसवा,

निघाले केशवा घर तुझे...

: म्हणजे काय म्हणायचे आहे नेमके तुम्हाला?

: जरा स्पष्ट करून सांगाल का?

: साडेसातशे वर्षांपूर्वीच्या कर्मठ समाजाविषयी भीती न बाळगता लोकांच्या कुचेष्टेची पर्वा न करता आपले म्हणणे निर्भीडपणे मांडण्याचे स्वातंत्र्य घेतले तिने. स्त्री-पुरुष समानता आणि सामाजिक न्याय हे शब्दप्रयोग तिनेच पुढे आणले... काय धाडस असेल बाईचे लक्षात घ्या!

: अरे व्वा,खरेच कमाल आहे!

: हे श्रद्धेचे, पांडुरंगाच्या पाठबळाचे, नामस्मरणाचे आणि आत्मविश्वासाचे शस्त्र जवळ असताना आपणही कोणाला काय घाबरण्याची गरज आहे?

: विचार करण्यासारखा आहे मुद्दा!

: म्हणून तर आपण हा कीर्तनाचा घाट घातलेला आहे!

: आता आलं लक्षात!

: मग करूया का सुरू?

: हो, हो करा

शारदाबाई : (यमुनाबाई आणि युगंधरा समोर दिसत नाहीत हे त्यांच्या लक्षात येते आणि त्या विचारतात) अरेच्या! यमुनाबाई कुठे दिसत नाहीत त्या? आता तर होत्या... कुठे गेल्या अचानक?

: आणि युगंधरापण होती त्यांच्याबरोबर, कुठे गेल्या दोघी? कोणाला काही बोलल्या का त्या?

: कुठे गेल्या हो?

: कुठे गेल्या?

: काहीतरी अडचण झाली असणार त्यांची.

: कसली तरी भीती वाटत असणार त्यांना!

: पण तसं सांगायचं ना त्यांनी!

: पण नक्की काय झालंय असं?

: अचानक युगंधरेच्या पोटात दुखू लागलं, मळमळू लागलं, पाय दुखू लागले...

: हो, असं काहीतरी म्हणत होत्या यमुनाबाई.

: पण म्हणून काय कीर्तन सोडून जायचे?

: काहीतरी वेगळीच अडचण झाली असेल.

शारदाबाई : स्पष्टपणे का बोलत नाही तुम्ही? आणि गेल्या तरी कुठे त्या नेमक्या? चला आपण शोधूया त्यांना.

: पण एवढ्या मोठ्या गावात शोधायचं तरी कुठे त्यांना?

: बहुतेक घरी गेल्या असतील त्या!

: प्रश्नच आहे खरा पण पांडुरंग येईल आपल्या मदतीला चला, या तुम्ही माझ्या मागोमाग...

(शारदाबाई पुढे. सर्वजणी त्यांच्या मागोमाग गोलाकार फिरत जिकडे यमुनाबाई आणि युगंधारा बसल्या आहेत तिकडे जाऊन पोचतात. जाताना शारदाबाईंचे भजन सुरू. इतरजणी त्यांना साथ देत आहेत)

नको देवराया अंत आता पाहू,

प्राण हा सर्वथा जाऊ पाहे...

हरिणीचे पाडस व्याघ्रे धरियेले,

मजलागी जाहले तैसे देवा...

तुजवीण ठाव न दिसे त्रिभुवनी,

धावे हो जननी विठाबाई...

मोकलोनी आस जाहले उदास,

घेई कान्होपात्रेस हृदयात...

( युगंधरा एका छोट्या स्टूलवर बसलेली. यमुनाबाई तिच्या बाजूला तिला आधार देत, तिच्या डोक्यावरून हात फिरवत उभ्या. दोघीही चिंतीत)

: काय झालं युगा?

: काय झालं यमुनाबाई?

: अशा मधेच कीर्तन सोडून का आलात?

यमुनाबाई : कसं सांगू? आम्ही नाही सांगू शकत!

: असे न सांगता येण्यासारखे काय आहे त्यात?

: असे न बोलता येण्यासारखे काय आहे त्यात?

: तिकडे सगळ्याजणी वाट पाहत होत्या तुमची.

यमुनाबाई : कसे सांगू तुम्हाला, आमचा थोडा प्रॉब्लेम झाला आहे.

: कसला प्रॉब्लेम?

यमुनाबाई : ते असं सांगता येण्यासारखं नाही.

: सांगायचं नसेल तर नका सांगू पण देवळात तर चला आधी! कीर्तन सुरू करू! तुमच्यासाठी थांबलंय ते, चला!

यमुनाबाई : नाही नाही,तिकडे येऊ शकत नाही आम्ही.

: का बरं?

य : कारण ते पवित्र स्थान. तेथे प्रत्यक्ष परमेश्वराचा वास. तिकडे येऊन आम्ही संकट का ओढवून घ्यावे?

: काय म्हणताय यमुनाबाई, कसले संकट? आणि आपण सारी जर त्या परमेश्वराची लेकरे असू तर तुम्हाला संकटात टाकून त्याचा काय फायदा होणार आहे?

: नको, नको! भलतेच पाप व्हायचे हातून!

: या जगात पाप-पुण्य असे काहीच नसतं यमुनाबाई! नेमकं काय झालंय ते सांगा तरी!

: (संकोचाने) मुलगी वयात येताना तिच्या आयुष्यात जे एक अवघड वळण येते ती गोष्ट घडली आहे...

शारदाबाई : अहो एवढ्या आडून-आडून काय सांगताय? सरळ सांगा की युगंधरेची पाळी सुरू झाली आहे म्हणून!

: हो तसेच म्हणायचे होते मला!

शारदाबाई : अहो ती तर अगदी घरोघरी घडणारी गोष्ट, त्यात घाबरून जाण्यासारखे काय आहे?

: नसता बोभाटा व्हायचा!

: त्यात कसला बोभाटा? पूर्वीच्या काळी तर आपल्याकडे मुलीला न्हाण आल्यावर त्याचा सोहळा साजरा करण्याची पद्धत होती.

: पण तरीसुद्धा लज्जा, संकोच म्हणून काही असतेच ना?

शारदाबाई : त्यात कसली आलीय लज्जा आणि संकोच?

साधा शरीरधर्म तो!

: शरीरधर्म?

: जीवनाच्या परिपूर्णतेचे दर्शन घडवणारी अगदी नैसर्गिक घटना!

: पण तिचं प्रदर्शन करायचं? लोक काय म्हणतील?

शारदाबाई : (सस्मित वदनाने प्रेक्षकांना) मंडळी, लोक काय म्हणतील! दुनिया का सबसे बडा रोग ऽऽऽ?

सर्वजणी : क्या कहेंगे लोऽऽऽग!

शारदाबाई : कळतं पण वळत नाही म्हणतात ते हे असं!

: म्हणजे नेमकं काय म्हणायचं आहे तुम्हाला ?

शारदाबाई : आपले थोर समाज सुधारक महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी सव्वाशे वर्षांपूर्वी निराधार महिलांसाठी आश्रम काढला, त्यांच्या सुरक्षित बाळंतपणाची सोय केली, विधवा विवाहाची चळवळ सुरू केली...

: हो की!

: त्यांच्या मुलानं अर्थात् र.धों. कर्वे यांनी त्यांच्याप्रमाणेच संतती नियमनासाठी अभूतपूर्व अशी चळवळ सुरू केली.

: अगदी खरं!

: अशा नाजूक विषयांवर नुसते बोलणे हा सुद्धा गुन्हा मानला जात होता त्या काळात!

: विशेष कौतुक म्हणजे र.धों. कर्वे यांच्या पत्नीने त्यांना या कामात साथ दिली.

: खरं म्हणता की काय?

: मी कशाला खोटे बोलू? ‘समाजस्वास्थ्य’चे अंक आहेत अजून!

: नाही, तसं म्हणायचं नव्हतं मला!

: सावित्रीबाई फुले यांनी देशातील मुलींची पहिली शाळा सुरू केली. त्यासाठी रस्त्यावरून जाताना शेणाचा मार सहन करावा लागला त्यांना. या थोर माणसांनी लज्जा आणि संकोच याचा विचार केला असता तर आज आपण इथे येऊन पोहोचलो असतो का?

: हे मात्र खरे आहे तुमचे!

: अगदी बरोबर?

: मग अशा या उदाहरणांमधून आपण काही शिकणार आहोत की नाही?

: महत्त्वाचा मुद्दा आहे अगदी!

: पण आपण बोलण्यात पुढे आणि कृती करण्यात मागे असतो! लोकमान्य टिळकांनी अशा लोकांना ‘बोलके सुधारक’ असे म्हटले आहे!

: काही बोलके सुधारक आणि काही कर्ते सुधारक!

: मग आता तुम्हीच ठरवा,आपण बोलके सुधारक व्हायचे की कर्ते?

: प्रश्न लाख मोलाचा आहे!

शारदाबाई : आहे ना? चला बोला... (हलकीशी उडी मारत) ठ्ठालवी ठ्ठालवी ठ्ठालवी ठ्ठालवी...

सर्वजण : (प्रत्येकजण तशीच हलकीशी उडी मारत)

ठ्ठालवी ठ्ठालवी ठ्ठालवी ठ्ठालवी!

शारदाबाई : पुंडलिका वरदे ऽऽऽ

: हरी विठ्ठल!

: श्रीज्ञानदेव ऽऽऽ

: तुकाराम!

: पंढरीनाथ महाराज की?

: जय!

: अहो पण कृती करायची म्हणजे नेमके करायचे तरी काय?

शारदाबाई : दुसरं काय, युगंधरेला आणि यमुनाबाईंना पाळीविषयीची वस्तुस्थिती समजावून सांगायची, त्या दृष्टीने त्यांना आवश्यक ती मदत करायची आणि लोक प्रबोधनाचे पुण्यही मिळवायचे...

: बापरे! ‘पाळी’ या विषयावर प्रबोधन?

: नाहीतरी तुम्हाला विषय हवाच होता ना कीर्तनासाठी? आयताच मिळाला तो!

: मला नाही पटत...

: मलाही नाही पटत!

: कसली तरी अनामिक भीती वाटतेय!

: कसली भीती?

: देवाचा कोप होईल आपल्यावर!

: ‘आमचे हे’ मला घरातून बाहेर काढतील!

: ‘आमचे हे’ तर इतके कर्मठ आहेत की त्यांना जर हे कळले तर जमदग्नीचा अवतार धारण करतील ते! कीर्तन वगैरे सगळं बंद करून घरी बसवतील मला!

: ‘आमचे हे’ सुद्धा आपल्या प्रतिष्ठेला इतके जपतात की घरातील एकही गोष्ट बाहेर पडता कामा नये असा दंडक असतो त्यांचा!

: ‘आमचे हे’ सुद्धा सोवळ्या-ओवळ्याच्या बाबतीत इतके कडक आहेत की आशा बाईच्या वाऱ्यालासुद्धा उभे राहणार नाहीत...

शारदाबाई : तुम्ही ‘आमचे हे, आमचे हे’ करत आहात पण मला एक सांगा ‘आमचे हे’ या जगात आले कसे?

: कसे म्हणजे काय?

: माणसाचा जन्म कोठून होतो, आईच्या उदरातूनच ना?

: अर्थातच?

: मग तेच मी सांगतेय तुम्हाला. जर आई नसती आणि ती निसर्ग नियमानुसार ती सृजनयोग्य झाली नसती तर ‘आमचे हे’ जन्माला आले असते का?

: बरोबर!

: आणि देवाचा कोप तरी कशाला होईल? त्यालासुद्धा जन्माला येण्यासाठी आई हवीच ना?

: अगदी बिनतोड मुद्दा आहे तुमचा!

: पण तरीही ‘पाळी’ ही अगदी खाजगी गोष्ट!

: म्हणूनच तिला आपण विटाळ असे म्हणतो.

: ती का जगासमोर मिरवण्याची गोष्ट?

: ती का अभिमान बाळगण्याची गोष्ट?

: ती का कीर्तनात आणायची गोष्ट?

: राम राम राम राम!

शारदाबाई : मला एक सांगा, द्रौपदीला ती रजस्वला असताना भर सभेत आणून तिची विटंबना केलेली कशी चालते तुम्हाला?

: भलतंच काय?

: काय भलतंच? खोटं बोलतेय का मी? आणि तिला वस्त्रं पुरवण्यासाठी म्हणजेच आजच्या भाषेत बोलायचे तर सपोर्ट करण्यासाठी प्रत्यक्ष भगवान श्रीकृष्ण त्या ठिकाणी धावून गेलेच ना?

: हो, गेले की!

: मग देव ज्या गोष्टी करतो अशा गोष्टी आपण माणसांनी करायला काय हरकत आहे?

: हे मात्र अगदी पटण्यासारखे आहे.

शारदा : जिजाबाईसारखी माता नसती तर शिवाजी राजांसारखा पराक्रमी पुरुष जन्माला आला असता का?

: खरे आहे तुमचे पण – (तिला काहीतरी सांगायचे आहे)

शारदाबाई : (तिचे वाक्य स्वतः पूर्ण करत) पण शिवाजी जन्माला यावा तो दुसऱ्याच्या घरात असेच ना? बोला पुंडलिका वरदे ऽऽऽ

: हरी विठ्ठल!

: श्रीज्ञानदेव ऽऽऽ

: तुकाराम!

: पंढरीनाथ महाराज की ऽऽऽ

: जय!

शारदाबाई : (युगंधरेला) ये बाळ अशी पुढे ये!(ती हळूहळू पुढे येते. त्या तिला जवळ घेतात आणि आश्वासकपणे–)

अगं पाळी सुरू होण्यासारखी दुसरी सुंदर गोष्ट नाही बाईच्या आयुष्यात...

: पण डोके चांगलेच दुखत आहे–

: पाळी सुरू होण्याच्या काळात शरीरात काही बदल होऊ लागतात त्यामुळे पोटात दुखणे, पाय दुखणे, मळमळणे अशा गोष्टी घडू शकतात. पण तो आजार नाही हे लक्षात घ्यायचं.

: मनाचाही गोंधळ उडालाय!

: त्यात काय गोंधळायचं? वयाची पंधरा-सोळा वर्षे झाली की मुलीला दरमहा पाळी सुरू होते. तीन-चार दिवस राहते आणि आपोआप थांबते. पन्नाशीनंतर पूर्णपणे बंद होते... माणसाचा वंश पुढे चालू राहावा यासाठी निसर्गाने केलेली रचना आहे ही! आपण जसा श्वास घेतो तितकी स्वाभाविक आणि सोपी!

: (गोंधळलेली) पण ते...

: काय ते?

: शी ऽऽऽ सांगायला सुद्धा नकोसं वाटतं...

: (लक्षात घेत) त्याची काळजी करू नको आपण स्वच्छता बाळगली म्हणजे झाले! अशावेळी स्त्रीच्या जननेंद्रियातून काही स्त्राव रक्तरुपाने बाहेर पडून निघून जातो! तो काही आजार नाही किंवा त्यात काहीही मोठे रहस्य दडलेले नाही! मात्र आपण त्याबाबत निर्माण करून ठेवलेल्या चित्रविचित्र कल्पना मनाला कायम चिकटून राहतात...

युगंधरा : पण मग आमच्यासारख्या मुलींनी काय करायचे नेमके?

: सांगितलं ना, स्वच्छता बाळगली की झाले! आणि लक्षात ठेव, पाळीत शरीरातून बाहेर येणारे रक्त शरीराला कायम चिकटून राहत नाही. आंघोळ केल्यावर शरीर स्वच्छ होते तेवढी सोपी गोष्ट आहे ती! खाणे पिणे, अभ्यास, खेळणे सगळ्या गोष्टी व्यवस्थित सुरू ठेवायच्या अगदी, काय?

: खरं आहे तुमचं पण कोणाशी काही बोलायची, मन मोकळे करण्याचीसुद्धा सोय नाही!

: त्याला कारण म्हणजे आपण निर्माण करून ठेवलेली लज्जेची, शरमेची भावना! ती आपल्या मनावर अधिक आघात करते... जी गोष्ट सहज सुंदर आणि नैसर्गिक आहे त्याविषयी गिल्ट कसली बाळगायची? बिनधास्त राहायचं अशावेळी आपण!

युगंधरा : म्हणजे शारीरिक आणि मानसिक अशा दोन्ही पातळ्यांवर खंबीर राहायचं असंच ना?

: अगदी बरोबर! पाळी हा कलंक न मानता उजळ माथ्याने आणि आत्मविश्वासाने तिला सामोरे गेले पाहिजे आपण.

: अगबाई!

: पुन्हा तेच?

शारदाबाई : (प्रेक्षकांना) मंडळी, मासिक पाळी हा शब्द उच्चारताच आपण कॉन्शन्स होऊन जातो, अंगावर पाल पडावी तसे वाटते आपल्याला! पण खरंच ही गोष्ट इतकी किळसवाणी आहे का? उलट एखाद्या कुमारीकेचे युवतीमध्ये रूपांतर होणे ही अतिशय सुंदर आणि नैसर्गिक गोष्ट आहे हे लक्षात का घेत नाही आपण?

: तसे एका अर्थी खरे आहे तुमचे म्हणणे!

: थोडा विचार केला तर योग्यच वाटते ते!

: नवनिर्माणाची एवढी मोठी शक्ती आहे स्त्रीच्या ठाई पण त्याबद्दल अभिमान बाळगायचे राहिले बाजूलाच उलट आपल्याच अडचणीत आणतो आपण!

: तुम्ही एवढ्या ठामपणे कसे सांगू शकता हे?

: त्या साहित्यात पीएचडी केलेल्या डॉक्टर नाहीत तर मेडिकलमधील डॉक्टर आहेत हे लक्षात घ्यावे सगळ्यांनी!

मेडिकल डॉक्टर?

: हो आणि त्या सुद्धा गायनाकॉलॉजिस्ट!

: असं होय? मग बरोबर असेल त्यांचं!

: तुम्ही काहीही म्हणा,पण आमच्या वेळी असं नव्हतं...

: पाच-पाच दिवस बाजूला बसायच्या आम्ही!

: अंघोळ नाही की कोणाशी संपर्क नाही!

: ते सोडा हो...आमची आजी तर अशी होती की चार मुलं झाली तरी तिने नवऱ्याचं तोंड बघितलेलं नव्हतं!

: आमच्या आजीला मुलगा बघायला आला तेव्हा पायाच्या अंगठ्याने ती जमीन उकरत बसली ती अगदी लग्न होईपर्यंत हलली नव्हती तेथून!

: मग आपणपण तिथेच अंगठ्याने जमीन उकरत बसायचं का आताही? काळाप्रमाणे बदलायला नको?

: खर आहे तुमचं पण आपण एकट्या काय करणार? पुरुषांची आणि पालकांची सुद्धा साथ मिळाली पाहिजे ना!

शारदाबाई : हे मात्र खरे आहे तुमचे! शाळा महाविद्यालया- तून या विषयाकडे गंभीरपणे पाहिले जात नाही अजून,

: मग काय करायचे?

: त्यासाठी आपल्यालाच पुढाकार घेणे भाग आहे.

: म्हणजे काय करायचं नेमके?

: जीव कसा निर्माण होतो, त्यासाठी शरीरात कोणती यंत्रणा कार्यरत असते, तिची काळजी कशी घ्यायची... याविषयी अगदी सहजसोप्या भाषेत आणि काहीही लपवून न ठेवता शिक्षकांनी मुलांशी बोलले पाहिजे. तसा आपण त्यांच्याकडे आग्रह धरला पाहिजे!

: पण समाजाचीसुद्धा काही जबाबदारी आहे ना?

: अगदी बरोबर!

: समाजातील प्रत्येक व्यक्तीने वयात येणाऱ्या मुलामुलीशी निकोप, निरोगी नाते जोडण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

: बरोबर!

: अशा मुलांचा आत्मविश्वास वाढविण्यासाठी आणि त्या दृष्टीने त्यांच्या लैंगिक वर्तनाला शास्त्रीय माहितीची जोड देण्याचा प्रयत्न केला पाहिजे.

: अरे व्वा!

: वा काय वा? स्वातंत्र्य मिळून इतकी वर्षे झाली तरी का करता येत नाही आपल्याला हे? देशाला आपण भारतमाता म्हणतो. ही माता आपल्या लेकरांची योग्य ती काळजी घेत नसेल तर असे शब्दांचे बुडबुडे फोडत बसायला काय अर्थ आहे?

: अगदी खरे आहे!

: या विषयाकडे मोकळ्या मनाने, निरोगी वृत्तीने पाहणारा समाज जोवर निर्माण होत नाही तोवर आपण आपल्या प्रगतीचे गोडवे गाण्यात काहीही अर्थ नाही!

: पण म्हणजे नेमकं काय केलं पाहिजे आपण?

: पाळीच्या दिवसात स्वच्छता बाळगणे ही सर्वात महत्त्वाची गोष्ट. त्यासाठी मुलींनी सॅनिटरी पॅड्स कशी वापरायची हे शिकवलं गेलं पाहिजे घरोघरी!

: इश्य ऽऽऽ काय हे?

: हल्ली गावोगावी मेडिकल स्टोअर्समध्ये सॅनिटरी पॅड्स उपलब्ध असतात. महिलांचे अनेक बचत गटही सुरक्षित आणि स्वस्त पॅड्स तयार करत असतात. त्याविषयीची माहिती शिक्षिकांनी विद्यार्थिनींना, पालकांना का करून देऊ नये?

: अहो भलतच काय बोलताय? लोक काय म्हणतील?

शारदाबाई : पुन्हा हरदासाची कथा मूळ पदावर... दुनिया का सबसे बडा रोऽऽऽग?

सर्वजणी : क्या कहेंगे लोऽऽऽग!

: (प्रेक्षकांना) तुम्हाला सांगते मंडळी! तामिळनाडूतील अरुणाचलम मुरुगनान्थम या संशोधकांनं अतिशय स्वस्त दरातील सॅनिटरी नॅपकिन्स तयार करणाऱ्या मशीनचा शोध लावला. आणि त्यामुळे आपला एक खूप मोठा प्रश्न सुटायला मदत झाली. ग्रामीण भागातील गोरगरीब मुलींना तर यामुळे खूप मोठा दिलासा मिळाला.आज देशाच्या कानाकोपऱ्यात अशी अनेक यंत्रे लावण्यात आली आहेत.

: अगं बाई खरं की काय?

: काय नाव म्हणालात त्यांचं?

: अरुणाचलम मुरुगनान्थम! या कामगिरीमुळे जगातील प्रमुख शंभर प्रभावशाली व्यक्तींमध्ये त्यांचा समावेश झाला. जगभर मोठी प्रसिद्धी मिळाली त्यांच्या संशोधनाला.

: मिळायलाच हवी!

: पटतंय मला सुद्धा आता!

: मानवी जीवन सुखी व्हावे म्हणून अनेक मोठमोठ्या संशोधकांनी खूप शोध लावले आहेत पण अरुणाचलम यांचा हा शोध द्रौपदीला वस्त्र पुरवणाऱ्या श्रीकृष्णाच्या मदतभावनेपेक्षा कमी मोलाचा नाही!

: अगदी खरं बोललात!

: खरंच फार मोठं काम केलं त्यांनी!

: एवढंच नाही तर हे नॅपकिन्स वापरून झाल्यावर त्यांची पुढील विल्हेवाट कशी लावता येईल यावरही मुरुगनान्थम यांनी संशोधन केलं आणि त्यासाठी चटकन विरघळून जाईल अशा मटेरियलचा शोध लावला.

: अगबाई कमाल आहे!

: खरंच मोठा माणूस म्हटलं पाहिजे त्याला.

: महिलांचं आरोग्य सुधारायला, त्यांचा आत्मविश्वास वाढायला याची मदत झालीच पण त्यांना या कामामुळे मोठ्या प्रमाणावर रोजगारही उपलब्ध झाला!

: अय्या हो, खरंच की!

: एकातून दुसरं चांगलं निघतं ते हे असं!

शारदाबाई : माझं बोलणं तुम्हाला कटू वाटेल तुम्हाला पण औषध कडू असलं तरी ते गुणकारी असतं...

: म्हणजे?

: कडू डोस दिल्याशिवाय जुने आजार बरे होत नाहीत.

: काय म्हणायचंय तुम्हाला?

: मेडिकल स्टोअरमध्ये जाऊन चोरून-लपून सॅनिटरी पॅड आणि कंडोमची मागणी करणारे आम्ही जोवर धीट होत नाही आणि मनातील अपराधीपणाची भावना काढून टाकत नाही तोवर या देशाचं काही खरं नाही!

सर्वजणी : (हलक्या हलक्या उड्या मारत) ठ्ठालवी ठ्ठालवी ठ्ठालवी ठ्ठालवी !

: बोला पंढरीनाथ महाराज की ऽऽऽ

: जय!

: श्रीज्ञानदेव ऽऽऽ

: तुकाराम!

: पंढरीनाथ महाराज की ऽऽऽ

: जय!

: मग आता काय करायचं?

: म्हणजे एवढं रामायण झालं तरी पुन्हा सीता रामाची कोण? मला काय म्हणायचं आहे ते या युगंधरेला बरोबर कळलेलं आहे... चला माझ्याबरोबर!

(पेटीचे सूर, तबला. युगंधरेच्या भोवती फेर धरत शारदाबाई ओवी म्हणू लागतात. पाठोपाठ इतरही एक एक करून, फेर धरून ओव्या म्हणत आहेत.)

पहिली-वहिली पाळी ग साजरी करीन

घरोघरी जाऊन मी जागर घालीन

दुसरी माझी ओवी ग फुलणाऱ्या कळीला

साऱ्याजणी मिळूनिया वाढवू रोपाला

तिसरी माझी ओवी ग पुरुषांच्या जातीला

पुढे यावे अमुच्या संगे त्यांनी जागराला

चौथी माझी ओवी ग उद्धार या देशाचा

कलंक कसला पाळी हा तर अंकुर निर्माणाचा

पाचवी माझी ओवी ग ओवी मी गाईन

युगंधरेच्या पाठीशी मी कायम उभी राहीन

सहावी माझी ओवी ग विज्ञानाची पूजा

संशोधन करिती जे जे त्यांच्या काबाडकष्टांना...

पहिली-वहिली पाळी ग साजरी करीन

घरोघरी जाऊन मी जागर घालीन...

शारदाबाई : बोला, पंढरीनाथ महाराज की ऽऽऽ

: जय!

शारदाबाई : कीर्तनात तुम्ही नेहमी मला पुष्पहार घालता.

पण आज या पुष्पहाराची खरी मानकरी आहे ती युगंधरा! (सर्वजणी टाळ्या वाजवत आहेत.आपल्या गळ्यातील हार काढून युगंधरेच्या गळ्यात घालत, पुढे बोलू लागतात) कीर्तन करताना तुम्ही नेहमी माझी ओटी भरता पण या वेळी मीच या युगंधरेची ओटी भरणार आहे... (तिची ओटी भरत आहेत साऱ्याजणी टाळ्या वाजवत आहेत) युगंधरे, आज मी तुला एक अनोखी भेट देणार आहे बरे का?

युगंधरा : कोणती भेट?

(त्या आपल्या साईड बॅगेमधून एक पुडके बाहेर काढतात आणि युगंधरेच्या हातात देतात)

युगंधरा : काय आहे हे?

( ‘काय आहे, काय आहे’ अशी साऱ्यांची कुजबुज सुरू.)

शारदाबाई : ही आहे तुझ्यासाठी खास भेट!

: पण आहे तरी काय ते?

: सॅनिटरी नॅपकिन!

: काय?

: हो, सॅनिटरी नॅपकिन! ही वस्तु दिसायला अगदी किरकोळ आणि प्रथमदर्शनी नकोशी वाटणारी आहे पण बाईच्या भावविश्वाला फार मोठा आधार देणारी चीज आहे ही बरं का?

: वा छान बोललात अगदी!

: पटलं ना?

: हो पटलं!

: काय पटलं सांगा एकेकीनं...

: हेच की पाळी हा कलंक नाही.

: तो आजार नाही.

: ती तर सृजनाची खूण!

: ती तर एक सुंदर गोष्ट

: ती तर वंश सातत्याची प्रेरणा

: अशावेळी स्वच्छता पाळायची ही सर्वात महत्त्वाची गोष्ट.

: कोणतीही अपराधाची भावना मनात बाळगायची नाही!

: शाब्बास! पण आता इथेच थांबणार आहोत का आपण?

: मग?

यमुनाबाई : आपणही काहीतरी कृती करायला पाहिजे!

: हो नक्कीच करायला पाहिजे.

: पण नेमकं करायचं काय?

: कीर्तन सुरू करताना विषय कोणता विषय घ्यायचा असा प्रश्न होता ना तो आता सुटलेला आहे.

: तो कसा काय?

: तो विषय आहे पाळीविषयीचे जनजागरण!

: काय?

: हो, पाळी विषयीचे जनजागरण! शहरात तर ते करायलाच पाहिजे पण खेड्यापाड्यात जाऊन तेथील महिलां-मुलींपर्यंत पोहोचणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

: डोळे उघडले तुम्ही आमचे.

: ग्रेट आहात तुम्ही.

: खरंच कसे आभार मानावे तुमचे कळत नाही.

: कीर्तनाच्या माध्यमातून एवढा संवेदनशील विषय मांडणं हे प्रकारचे धाडसच म्हणायला हवं!

शारदाबाई : (प्रेक्षकांना उद्देशून हात जोडत) रसिकहो, बोलण्याच्या ओघात आमच्याकडून काही वेडावाकडा शब्द गेला असेल, परंपरेची काही मोडतोड झाली असेल, कुणाच्या भावना दुखावल्या असतील तर मोकळ्या मनाने आम्हाला क्षमा करा!

प्रेक्षकातील एक जण : त्यात काय चुकीचं करताय तुम्ही असं वाटत नाही.

: बघा पटलं ना तुम्हालाही?

: हो हो अगदी पटलं!

: (त्यांचा मुद्दा पुढे सुरूच) वारकरी कीर्तन असो वा नारदीय कीर्तन, ते आपल्या साऱ्यांचे आदराचे स्थान...सर्व संतांचे प्रबोधनाचे लाडके माध्यम. त्या माध्यमातून आम्हाला आमची ही गोष्ट तुमच्यापर्यंत पोहोचवायची एवढाच उद्देश होता!

एक प्रेक्षक : अगदी बरोबर!

: नामदेव महाराजांनी म्हटले आहे की, नाचू कीर्तनाचे रंगी, ज्ञानदीप लावू जगी... ते म्हणतात, कीर्तनात आम्ही नाचतो ते मोक्ष मिळविण्यासाठी नाही तर ज्ञानाची ज्योत लावण्यासाठी...तेच काम आम्हालाही करायचे आहे आणि त्यात आपल्याही सहभागाची नितांत गरज आहे आम्हाला.

: बोला पुंडलिका वरदे ऽऽऽ

: हारी विठ्ठल

: श्रीज्ञानदेव

तुकाराम!

पंढरीनाथ महाराज की ऽऽऽ

: जय?

: तर मंडळी, चुकीच्या रूढींना कवटाळून बसण्याचा आग्रह सोडून देऊया... जागे होऊन कामाला लागू या... स्वामी विवेकानंदांनी ज्या सुभाषिताचा पुरस्कार केला ते नुसते पुस्तकात राहू न देता प्रत्यक्षात आणण्याची गरज आहे...
युगंधरा : कोणते सुभाषित?

उत्तिष्ठित जाग्रतप्राप्यवरान्निबोधत... उठ युगे, हे घे! आणि सुरू कर तुझे कीर्तन!

(शारदाबाई तिला सॅनिटरी नॅपकिनचे ते पुडके देतात. ते ती हातात घेते. पाठोपाठ त्या आपल्या गळ्यातील उपरणे काढून तिच्या कमरेला बांधतात. मग युगंधरा जणू एका नव्या निर्धाराने पुढे येत पुढील स्वगत म्हणत जणू रंगमंच ताब्यात घेते.)

युगंधरा :

मी युगंधरा,मी युगंधरा,

झुळूक एक वाऱ्याची

सळसळती प्रतिमा सृष्टीची,

अंधाराच्या वाटेवर पाजळणारी प्रभा ज्योतीची...

मी प्रेरणा, मी प्रतिभा, सगुण साकार विश्वाची

जीवनदायी संस्कृतीच्या निरंतर किमयेची

वादळाशी झुंजणाऱ्या कोमल कळीची,

नाळ माझी जोडलेली विश्वाच्या अनादी चैतन्याशी!

मी मीरा, मी सीता, मी द्रौपदी, मी कुंती

मी कृष्णाची राधा, मी नामयाची जनी

मी राणी झाशीची, मी सावित्रीबाई, मी रमाबाई

मी कल्पना चावला, मी पी.टी. उषा
मी नव्या युगाची आशा!

मी आहे नांगरली जाणारी भूमी
मी आहे वर वर जाणारा मोगऱ्याचा वेलू
मी आहे अखंड अंकुरणारी सुगंधी पाऊलवाट
आणि मी ज्ञानेश्वरांच्या संजीवक ओवीचा लयबद्ध घाट!

मी पुढेही चालवीन हे जग, समृद्ध करत नेईन
चालवत राहीन गाडा विश्वाचा
लढत राहीन, झुंजत राहीन, प्रकाश देत राहीन
टाकणार नाही घेतलेला वसा जीवनाच्या सातत्याचा!

पृथ्वी, आप, तेजाच्या पल्याड जाऊन
नव्या विश्वाची उभारणी करीन मी,
नव्या युगाच्या निर्माणसाठी
क्रांतीच्या आघाडीवर राहीन मी!

मी रुजेन जमिनीत बीज होऊन
मी जाईन आकाशात वीज होऊन
मी तळपेन तलवारीचे पाते होऊन
आणि मी जोजवेन जगाला दुधावरची साय होऊन

मी नाही अबला, मी नाही एकटी
सृष्टीच्या विध्वांसाची मला नाही भीती.
उत्पत्ती स्थिती आणि लय याचा अर्थ मला नीट माहीत आहे
सारे काही संपल्यावर अंकुरणाऱ्या सृजनाचा
मी एक धगधगता हुंकार आहे!

(तिचे स्वगत संपताना मागे साऱ्याजणी अर्थ वर्तुळाकार उभ्या. खालून प्रकाश वर येतो त्या प्रकाशात साऱ्या उजळून निघालेल्या. जणू आता त्याची अडचण दूर झालेली आहे,जीवनाचा अर्थ त्यांना कळलेला आहे. सर्व मुलींनी हातात तबके घेतलेली. त्यात तेवणारी निरंजने. युगंधरेला ओवाळून जणू तिची पूजा करत आहेत. तबकातल्या फुलांच्या पाकळ्यांचा तिच्यावर वर्षाव करत आहेत.

एकजण काठीला बांधलेली, एक भगवी पताका तिच्या हातात देते. युगंधरेने ती पताका खांद्यावर घेतलेली आहे. या विषयावरील पुढील जागरणासाठी जणू ती आता सिद्ध झाली आहे.)

युगंधरा : ( प्रेक्षकांना) मंडळी एखाद्या विषयावरची श्रद्धा, पांडुरंगाचे पाठबळ, नामस्मरणाचे शस्त्र आणि आत्मविश्वास आपल्या बाजूने असताना कोणताही प्रश्न सोडवणे आपल्यासाठी कठीण नाही...तर आपण सारेच या ज्ञानदानाच्या दिंडीत सहभागी होऊया. (कीर्तन करताना वारकरी कमरेवर हात ठेवून हलकीशी उडी मारत) ठ्ठालवी ठ्ठालवी, ठ्ठालवी, ठ्ठालवी...(म्हणू लागते)

सर्वजणी : (सगळ्या तशाच उड्या मारून टाळ वाजवत) ठ्ठालवी ठ्ठालवी ठ्ठालवी ठ्ठालवी हा नाद घुमवत युगंधरेचे अनुकरण करीत राहतात)

( एक ठेका पकडून युगंधरा गाऊ लागते)

या विठूचा गजर हरिनामाचा झेंडा रोविला

सर्वजणी : (तिला साथ देत जाऊ लागतात)

या विठूचा गजर हरिनामाचा झेंडा रोविला

: वाळवंटी चंद्रभागेच्या काठी डाव मांडला

: वाळवंटी चंद्रभागेच्या काठी डाव मांडला

: या संतांचा भक्तांचा मेळा गोपाळांचा डाव मांडला

: या विठूचा गजर हरिनामाचा झेंडा रोविला...

: बोला, पुंडलिक वरदे ऽऽऽ

: हरी विठ्ठल

: श्रीज्ञानदेव ऽऽऽ

: तुकाराम!

: पंढरीनाथ महाराज की ऽऽऽ

: जय!

(साऱ्याजणी प्रेक्षकांना अभिवादन करू लागतात. टाळ मृदुंगाचा गजर टिपेला जात आहे. हळूहळू पडदा.)

***

सूचना : या एकांकिकेचे सर्व हक्क लेखकाकडे राखीव आहेत. तिचे प्रयोग करण्यापूर्वी लेखकाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. तिचे भाषांतर, रूपांतर, त्यावर आधारित चित्रपट, चित्रमालिका, त्याचे अभिवाचन, यूट्युब-फेसबुकवरील किंवा अशाच प्रकारच्या विद्यमान अथवा भविष्यात येऊ घातलेल्या माध्यमातून पूर्ण, अंशतः किंवा अशा कोणत्याही प्रकारच्या चित्रिकरण, ध्वनिमुद्रण,प्रसारणापूर्वी लेखकाची परवानगी घेणे बंधनकारक आहे. यासंदर्भात काही वाद उद्भवल्यास संबंधित कायदेशीर कारवाई मुंबईक्षेत्रात होईल याची सर्व संबंधितानी नोंद घ्यावी.

प्रल्हाद जाधव

pralhadjadhav.one@gmail.com

9920077626

***